दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | रविवार १ जून २०२५ | अंक १६९० पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

प्रयत्न करत रहा, यश तुमच्या पावलांवर येईल.

SUN Tourism INTERNATIONAL PVT. LTD. Since 2007
All TOURS घर से घर तक — दिल से दिल तक — I'TIME TRAVEL INDUSTRY
www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या
ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका
व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555

# दोन्ही पवार कधी एकत्र येणार?

## शरद पवारांच्या उत्तरानं सर्वच बुचकळ्यात



गेल्या काही दिवसांपासून पुन्हा एकदा दोन्ही राष्ट्रवादी, राष्ट्रवादी शरद पवार गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गट हे एकत्र येणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे, दरम्यान याबाबत राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांना दोन्ही पवार कधी एकत्र येणार? असा थेट प्रश्न विचारण्यात आला, याला उत्तर देताना ते मला माहीत नाही असं उत्तर शरद पवार यांनी दिलं आहे. दरम्यान दोन्ही पवार एकत्र कधी येणार? या प्रश्नला उत्तर देताना शरद पवार यांनी थेट एकत्र येणार किंवा एकत्र येणार नाही? याबाबत कोणतंही वक्तव्य न करता कधी एकत्र येणार ते मला माहिती नाही असं म्हटलं आहे, त्यामुळे आता शरद पवार यांच्या या वक्तव्यानं चर्चेला उधाण आलं आहे. दरम्यान दोन्ही राष्ट्रवादी कधी एकत्र येणार यावर आता राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांची प्रतिक्रिया देखील समोर आली आहे.नेमकं काय म्हणाले रोहित पवार? 'दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार का? हा प्रश्न जसा तुम्हला पडला आहे, तसाच अनेकांना पडला आहे. दोन्ही पवार एकत्र येणार ही फक्त चर्चा आहे. वरिष्ठांनी याबाबत काहीही सांगितलेलं नाही. एक गोष्ट तुम्ही समजून घ्या, आजपर्यंत ही फक्त चर्चा आहे, वरिष्ठ पातळीवर पवार साहेब असतील, सुप्रिया सुळे असतील, जयंत पाटील असतील यांनी याबाबतीत आम्हाला कुठेही काहीही सांगितलेलं नाही, जर आम्हाला काही कळालं तर आम्ही नक्कीच मीडियासमोर येऊन बोलू,' असं रोहित पवार यांनी म्हटलं आहे.

### संजय शिरसाट यांची प्रतिक्रिया



दरम्यान यावर शिवसेना शिंदे गटाचे मंत्री संजय शिरसाट यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. शरद पवार साहेब आणि अजितदादांची बोलणी सुरू आहेत असं म्हणतात. मात्र याबाबत सध्या भाकीत करणं उचित नाही, परंतु काही दिवसांनंतर तुम्हाला याचं चित्र स्पष्ट होईल. शरद पवार साहेब पूर्वेला जायचं असेल तर पश्चिमेला चाललो असं सांगतात. म्हणून ते जे बोलले मला माहिती नाही याचा अर्थ सर्व गोष्टी त्यांना माहिती आहेत, फक्त नेमकं कोणत्या वेळेला याचा मुहूर्त ते शोधत आहेत, असं मंत्री शिरसाट यांनी म्हटलं आहे.

# बीड आकाशवाणी केंद्रास पूर्ण वेळ प्रसारण व कार्यक्रम अधिकारी मिळावा. डॉ. महेश गोलेकर यांची खा. बजरंग सोनवणे यांना मागणी.

बीड ( प्रतिनिधी) बीड आकाशवाणी केंद्रावरून यापूर्वी अतिशय उच्च प्रतीचे दर्जेदार कार्यक्रम प्रसारीत करून मोठ्या नावलौकिक प्राप्त केलेला आहे. या केंद्रावरून स्थानिकांना वाव देऊन अतिशय उत्तम दर्जाचे व्यासपीठ मिळवून दिलेले आहे. यामुळे जिल्ह्यातील स्थानीय कलाकारांना या केंद्राचा खूप फायदा झालेला आहे. या केंद्रामुळे अनेक सामाजिक प्रश्नांना वाचा फोडलेली आहे, परंतु आज या केंद्रास पूर्ण वेळ प्रसारण अधिकारी व कार्यक्रम अधिकारीच नसल्यामुळे या केंद्राचा कार्यभार दुसऱ्या केंद्रावरून चालवला जात आहे. या अगोदर देखील राष्ट्रवादी डॉक्टर सेल प्रदेश सचिव, डॉ. महेश गोलेकर यांनी बीड आकाशवाणीवर स्थानिक



कलाकारांना वाव मिळावा यासाठी मोठे प्रयत्न केलेले आहेत, याप्रसंगी त्यांनी बीडचे खासदार मा. बजरंग सोनवणे यांची भेट घेत बीड आकाशवाणीवर पूर्ण वेळ प्रसारण व कार्यक्रम अधिकारी मिळावा यासाठी मागणी केलेली आहे. यावेळी त्यांनी केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री यांची संपर्क साधून हा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन यावेळी दिले.

# एमपीएलफमध्ये बीडच्या पाच खेळाडूंची निवड

## बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या शिरपेचात मानाचा आणखी एक तुरा

बीड (प्रतिनिधी) दि.३१ : बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या पाच खेळाडूंनी महाराष्ट्र प्रीमियर लीग (एमपीएल) स्पर्धेसाठी निवड सुनिश्चित केली आहे. यामध्ये सचिन धस (कोल्हापूर टस्कर्स), ऋषिकेश सोनवणे (पुणेरी बाप्पा), सौरभ नवले आणि देव नवले (सातारा वॉरियर्स), तसेच समर्थ कदम (रत्नागिरी जेट्स) या खेळाडूंचा सहभाग आहे. ही निवड केवळ खेळाडूंच्या मेहनतीचे फलित नसून बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या पारदर्शक आणि गुणवत्तेला प्राधान्य देणाऱ्या निवड




प्रक्रियेचेही प्रत्यक्ष फलित आहे. अत्याधुनिक प्रशिक्षण केंद्रे, ब्रँडेड सुविधा आणि मोठ्या आर्थिक पाठबळाचा अभाव असूनही बीडचे खेळाडू राज्यस्तरावर चमकत आहेत, ही बाब निश्चितच जिल्ह्यासाठी गौरवाची आहे. या यशाबद्दल खेळाडूंना बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर, कार्याध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, सचिव आमेर सलीम, तसेच महेश वाघमारे, राजन साळवी, इरफान कुरेशी, मनोज जोगदंड, जावेद पाशा, रिजवान खान, शेख आरेफ, अतीक कुरेशी, सुनील गोपी शेट्टी, गोपाल गुरखूदे, सरफराज मोमीन, अक्षय नरवडे, पठाण शाहरुख आदींनी अभिनंदन केले आहे.

# पाटोदा मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने तालुक्यातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्नविद्यार्थी व पालकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद

पाटोदा ( प्रतिनिधी) पाटोदा तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने पाटोदा तालुक्यातील दहावी व बारावी परीक्षेत विशेष प्राविण्यासह यश संपादन करणाऱ्या तब्बल ५१ विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकासह सत्कार करण्यात आला पाटोदा रेणुका माता मंदिर येथील सभा मंडप येथे दिनांक 30 मे शुक्रवार रोजी सकाळी 11 वाजता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी वसंतराव नाईक विद्यालयाचे प्राचार्य तुकाराम तुपे सर होते तर प्रमुख पाहूणे म्हणून उपविभागीय अधिकारी शेख वसिमा (मॅडम) नायब तहसीलदार सय्यद मुल्ला साहेब, पोलीस उपनिरीक्षक भडके प्राचार्य नजीर पठाण, जेष्ठ पत्रकार छगन मुळे, राहुल शाहुराव जाधव, सय्यद



शहाबाज, जेष्ठ सेवा निवृत्त शिक्षक दे.मा. जावळे, प्राचार्य राजेंद्र आविळे आधी उपस्थित होते. तालुक्यातील जवळपास १५ विद्यालयाचे एकूण प्रत्येकी तीन प्रमाणे जवळपास ५१ विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते शाल श्रीफळ तसेच प्रशस्तिपत्र व स्मृतिचिन्ह देऊळ गौरविण्यात आले आहे. विशेष म्हणजे यशस्वी विद्यार्थ्यांच्या पालकांचाही यावेळी सत्कार करण्यात आला यावेळी यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना उपविभागीय अधिकारी शेख नसिमा यांनी सांगितले की यशस्वी विद्यार्थी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी मनाची तर चिकाटी पाळली पाहिजे जीवनातले आपले उद्देश ठेवा मात्र यामध्ये जर साध्य झाल्या जिद्दीने आणि अभ्यासातील चिकाटी तुम्हाला जरूर यशस्वी केल्या शिवाय रहाणार नाही. आपण आपल्या इच्छित स्थळी पोचू शकतो सोबतच त्यांनी या संदर्भात अनेक यशस्वी विद्यार्थ्यांची उदाहरणे दिले यावेळी प्राचार्य तुकाराम तुपे यांचीही अध्यक्षस्थानी होते अध्यक्षीय भाषणात बोलताना तुकाराम तुपे यांनी सांगितले की विद्यार्थ्यांवर पालकांनी सतत लक्ष ठेवण्याची अत्यंत आज काळाची गरज असल्याचे सांगून विद्यार्थी सुद्धा आपल्याला योग्य ठिकाणी जाण्यासाठी मेहनत व चिकाटी आणि ठेवण्यास आपले उद्दिष्ट साध्य करू शकतो असे सांगितले यांनी आपल्या आपल्या मार्गदर्शनपर भाषण घेऊ कार्यक्रमा यशस्वी करण्यासाठी पत्रकार संघाचे जेष्ठ पत्रकार छगन मुळे, तालुका अध्यक्ष अजय जोशी जिल्हा उपाध्यक्ष कादर मकरानी ,संजय सानप, हमीदखान पठाण,जावेद शेख, अनिल गायकवाड ,पवन भोकरे, सचिन शिंदे, सय्यद फय्याज, सतिश गर्जे,सय्यद साजिद, दत्ता देशमाने, दिगंबर नाईकनवरे, कार्यक्रमासाठी कार्यक्रमाची

प्रस्ताविक प्रा. सचिन पवार यांनी केले सूत्रसंचालन कादर मकरानी तर आभार हमीदखान पठाण यांनी मानले,

# जोमेगाव येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात साजरी

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची त्रिशताब्दी जयंती जोमेगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज चौकात मोठ्या संख्येने उत्साहात साजरी करण्यात आली. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रसंत गाडगेबाबा लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला



पुष्पहार अर्पण करून राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी भास्करराव पाटील शिंदे सुधाकर पाटील शिंदे,संजय पाटील शिंदे मा.सरपंच अदिनाथ शिंदे,पुरभाजी शेटे,पोलीस पाटील मारोती पांचाळ सरपंच प्रतिनिधी मारोती शिंदे ,नारायण कमजळे,देवानंद कमजळे,माधव वैजाळे,दशरथ पाटील,मनोहर भुरे,विनोद शिंदे,नारायण शिंदे,शिवाजी माळेगावे,हणमंत शिंदे यांच्यासह समाज बांधव व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी ; गट प्रवर्तक महिलांचा सन्मान

लिंबागणेश:-( दि.३१) बीड तालुक्यातील लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात आज दि.३१ वार शनिवार रोजी कर्मयोगिनी अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच बालासाहेब जाधव तर प्रमुख उपस्थिती म्हणून लिंबागणेशचे भुमिपुत्र नवनियुक्त पुरवठा निरीक्षक म्हणून बुलढाणा येथे कार्यरत असलेले प्रथमेश राजेभाऊ गिरे यांची उपस्थिती होती. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भिम टायगर ग्रुप बीड जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ यांनी केले तर आभार प्रदर्शन ग्रामविकास अधिकारी श्रीराम वीर यांनी मानले. प्रमुख वक्ते म्हणून डॉ.गणेश ढवळे यांनी कर्मयोगिनी अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा जीवनपट उलगडताना मध्ययुगीन कालखंडात भारताच्या इतिहासात ज्या महान स्त्रिया होऊन गेल्या त्यांच्यामध्ये राजमाता जिजाऊ नंतर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे अद्वितीय स्थान असुन धार्मिक, सामाजिक आणि राजकीय कर्तृत्ववाने भारतभर त्यांनी मोठी किर्ती आणि नावलैकीक मिळवले.संपुर्ण भारतभर मंदिरे बांधणे,मंदिरांचा जीर्णोद्धार,नद्यांवर घाट बांधणे, पिण्याच्या पाण्यासाठी विहिरी खोदणे, धर्मशाळा बांधणे, अन्नछत्रे चालवणे आदी लोककल्याणकारी कार्याच्या खुणा आजही भारतभर दिसून येतात.२४ मार्च १७५४ मध्ये पती खंडेराव यांना सूरजला जाट बरोबर कुंभेरी येथे झालेल्या लढाईत वीर मरण आले. तो काळ सती प्रथेचा होता. त्या काळात खंडेरायांच्या सोबत सती जाण्याचे नाकारून अहिल्यामाईंनी आपल्या पुरोगामित्वाचा परिचय दिला होता .आता अहिल्यामाईंनी धर्म,प्रथा, रूढी ,परंपरा या पलीकडे कर्तव्य महत्त्वाचे मानुन लोककल्याणासाठी जगण्याचा निर्धार केला. ज्या रूढी, प्रथा, परंपरा अंधाराकडुन प्रकाशाकडे नेतात त्याच आम्हाला मान्य आहेत




अशी ठाम भूमिका घेतली. धार्मिक भावना जपत चुकीच्या पुढे परंपरांना छेद दिला. सतीप्रथा, हुंडाप्रथा, बालविवाह यास विरोध करत धर्म चिकित्सेला प्रारंभ करणाऱ्या अहिल्यामाईंचे विचार आणि कृती क्रांतिकारक आणि प्रेरणादायी होती. अहिल्यामाई होळकर यांनी महिला सशक्तीकरणावर विशेष भर दिला होता .विधवा स्त्रियांसाठी कायद्यात बदल केले. त्यांना मुल दत्तक घेण्याचा अधिकार, उदरनिर्वाहाकरीता पतीच्या संपत्तीत अधिकार मिळवून दिला. शिवाय दत्तक पत्रावर आकारला जाणारा नजराणा( कर ) रद्द केला. स्त्रीसक्षमीकरणाच्या दृष्टीने ही पावले क्रांतीकारक होती असे प्रतिपादन केले. यावेळी राजेभाऊ गिरे, अनंतकाका मुळे,उपसरपंच बाळकृष्ण थोरात, ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ, रमेश गायकवाड, समीर शेख, अशोक जाधव, सुरेश निर्मळ, युवराज गिरे, रामचंद्र मुळे,आदी उपस्थित होते.

### ग्रामपंचायतीच्या वतीने पुरवठा निरीक्षक पदी नियुक्त प्रथमेश गिरे व गट प्रवर्तक सिमा वखरे व ज्योती गिरे यांचा सन्मान

लिंबागणेशचे भुमिपुत्र प्रथमेश राजेभाऊ गिरे यांची पुरवठा निरीक्षक पदी बुलढाणा येथे नियुक्ती झाल्याबद्दल शाल श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याचवेळी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा गट प्रवर्तक सिमाताई वखरे व ज्योती गिरे यांचा ग्रामपंचायतच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त सन्मान पत्र,रोख पाचशे रुपये आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
रविवार १ जून २०२५
https://lokaarambh.com



संपादकीय

## परकीय गुंतवणूकदारांचा महाराष्ट्रावर विश्वास!

देशामध्ये महाराष्ट्र राज्य गु ंतवणुकीसाठी, शांततेसाठी, उपजीविकेसाठी विश्वसनीय व आशादायक ठिकाण असल्याचे चित्र स्वातंत्र्य मिळाल्यापासून निर्माण झाले आहे, ते आजतागायत कायम आहे. अर्थात देशातील अन्य राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील राजकीय वातावरण, सत्ताधारी तसेच विरोधी घटकही प्रगल्भ असल्याने तसेच अन्य राज्यांच्या तुलनेने महाराष्ट्रात पायाभूत सुविधाही तसेच कुशल व अकुशल मजूर वर्ग, अधिकारी वर्ग अधिकाधिक प्रमाणावर सहजासहजी उपलब्ध होत असल्याने परकीय गु ंतवणूकदारांना भारतात गुंतवणूक करावयाची झाल्यास ते महाराष्ट्राला अधिक पसंती देत असतात. राजकीय स्थिरता हा घटक परकीय गु ंतवणूकदारांसाठी महत्त्वाचा भाग ठरत असतो. महाराष्ट्रामध्ये राजकीय स्थिरता नेहमीच राहिलेली आहे. १९७७ मधील पुलोद राजवट व २०१९मधील मविआ सरकारचा अपवाद वगळता अन्य राज्य सरकारांनी आपली पाच वर्षे पूर्ण केलेली आहेत. भारतीय रिझर्व्ह बँकेने नुकतीच देशातील परकीय गु ंतवणुकीची राज्यनिहाय आकडेवारी जाहीर केली असून, त्यानुसार महाराष्ट्र देशात अव्वल स्थानी पोहोचला आहे. एकट्या महाराष्ट्रात एकूण गुंतवणुकीच्या तब्बल ४० टक्के परकीय गु ंतवणूक झाली असून, ही आकडेवारी राज्यासाठी अभिमानास्पद आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तिमाहीत महाराष्ट्रात २५ हजार ४४१ कोटी रुपयांची परकीय गुंतवणूक झाली आहे. संपूर्ण आर्थिक वर्षात महाराष्ट्राने एकूण १,६४,८७५ कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. ही गुंतवणूक देशातील एकूण ४,२१,९२९ कोटी रुपयांपैकी ४० टक्के आहे. ही गतवर्षीच्या तुलनेत ३२ टक्के वाढ आहे आणि गेल्या १० वर्षांतील विक्रमी गुंतवणूक आहे. परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र ही गुंतवणूकदारांची पहिली पसंती असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले. परकीय गुंतवणुकीत देश पातळीवर महाराष्ट्राने आघाडी घेतली आहे. गत आर्थिक वर्षात (जानेवारी ते मार्च २०२५) शेवटच्या तिमाहीत २५,४४१ कोटी रुपयांची गुंतवणूक महाराष्ट्रात आली आहे. हे वर्ष महाराष्ट्रासाठी विक्रमी ठरले असून, मागील दहा वर्षांतील सर्वोच्च परकीय गुंतवणुकीचा नवा उच्चांक प्रस्थापित झाला आहे. विशेष म्हणजे, हा उच्चांक आर्थिक वर्षाच्या पहिल्या नऊ महिन्यांतच पार झाला आहे. २०१५-१६ मध्ये महाराष्ट्रामध्ये परकीय गुंतवणूकदारांनी ६१ हजार ४८२ कोटी रुपयांची गुंतवणूक केली होती. २०२४-२५ मध्ये परकीय गुंतवणूकदारांनी थेट एक लाख ६४ हजार ८७५ कोटी रुपयांची केलेली गुंतवणूक पाहता दहा वर्षांच्या कालावधीत १ लाख ३ हजार ३९३ कोटी रुपयांची वाढ झालेली आहे. हे चित्र अशक्य वाटत असले तरी वास्तवदर्शी असून आरबीआयनेच अधिकृतरीत्या ही माहिती दिलेली आहे. महाराष्ट्रात राज्य पावणेदोन लाख कोटींच्या जवळपास गु ंतवणूक होत असताना कर्नाटकमध्ये ५६,०३० कोटी, दिल्लीमध्ये ५१,५४० कोटी, गुजरातमध्ये ४७,९४७ कोटी, तमिळनाडूमध्ये ३१,१०३ कोटी, हरियाणामध्ये २६,६०० कोटी, तेलंगणामध्ये २५,३५१ कोटी परकीय गु ंतवणूक झालेली आहे. महाराष्ट्राच्या तुलनेत ही गु ंतवणूक कमी असल्याने परकीय गु ंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी अन्य राज्ये भगिरथ प्रयत्न करत असले तरी त्यांनी महाराष्ट्रातच गुंतवणुकीला प्राधान्य देताना नकळतपणे महाराष्ट्रावरील विश्वासाला शिक्कामोर्तब केलेले आहे. महाराष्ट्रातील सत्ताधारी नेतेमंडळी त्यांच्या राजवटीत परकीय गु ंतवणुकीदारांना आकर्षित करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. या प्रयत्नांना आता मूर्त स्वरूप प्राप्त झाले आहेत. २०१६-१७ मध्ये महाराष्ट्रात १ लाख ३१ हजार ९८० कोटी रुपयांची गुंतवणूक झाली होती. त्यानंतर गु ंतवणुकीचा आलेख २०१८-१९, २०१९-२०मध्ये घसरला होता. तथापि २०२०-२१ पासून पुन्हा एकवार महाराष्ट्रामध्ये परकीय गु ंतवणूकदारांच्या गु ंतवणुकीचा ओघ वाढू लागला. गुंतवणुकीचा आकडा १ लाख कोटींच्या पुढे गेला आणि आता तोच आकडा दीड लाख कोटींच्या पुढे गेला आहे. महाराष्ट्रामध्ये शहरीकरणाची प्रक्रिया वेगाने विकसित होत असून ग्रामीण भागाचा चेहरा-मोहरा बदलत आहे. ग्रामीण भागात सुविधांचे वाढते जाळे, राज्य सरकारकडून उद्योजकांना वाढते सहकार्य, कामगारांची मुबलक प्रमाणावर उपलब्धता, चांगले व दर्जेदार रस्ते, कामगार संघटनांचे निरुपद्रवी भूमिका यामुळे अन्य राज्यांच्या तुलनेत देशातील तसेच विदेशातील गुंतवणूकदारांचा विश्वास संपादन करण्यात महाराष्ट्राने आघाडी घेतली आहे. महाराष्ट्रात सध्या महायुतीचे सरकार आहे. देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र पुन्हा प्रगतिपथावर गरुडभरारी घेऊ लागला आहे. कोरोना काळात महाराष्ट्रातील अर्थकारणातील गती मंदावली होती. एमआयडीसीतील कंपन्या-कारखान्यांना टाळे लागले होते. पान १ वरून.... गहिनीनाथ नगर घरफोडी बुधवारी सकाळी साडेदहा वाजता शेतात कामाला गेले होते. दुपारी दोन वाजता परत आल्यावर घराचे कुलूप तुटलेले दिसले तर पोट माळ्यावर ठेवलेली बॅग उघडी व सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले. बॅगमधील साडेपाच तोळे सोन्याचे दागिने, गंठण, नेकलेस, झुंबर, अंगठी, आणि एक लाख रुपये रोख रक्कम एकूण पाच लाख पंचेचाळीस हजार रुपयांचा ऐवज चोरी गेल्याचे निदर्शनास आले. शहादेव प्रल्हाद लाड यांच्या फिर्यादीवरून गोंदी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरा विरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी अधिकचा तपास जमादार रामदास केंद्रे व फुलचंद हाजारे हे करीत आहेत.` गहिनीनाथ नगर येथील शेतकरी दाम्पत्य शहादेव प्रल्हाद लाड यांच्या घरातील अज्ञात चोरांनी केलेले अस्ताव्यस्त सामान, पर्स,--------- साबला येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी श्रीमती ज्योती सांबरे , ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर पांचाळ , पवन सरवदे , पोपट काकडे तसेच रामराजे शिंदे , महादेव काकडे , गोरख काकडे , दत्तात्रय काकडे , अंगद काकडे , गुलाब मुळे , माऊली नाईकनवरे , समाजसेवक नरहरी काकडे जालींदर मुळे , लक्ष्मण काकडे इत्यादी नागरिक उपस्थित होते.---------- निकालापूर्वीच विद्यार्थी प्राचार्य रमण देशपांडे व कंपनीचे प्रतिनिधी श्री अर्जुन कुमार, विद्यार्थी व पालक यांची उपस्थिती होती . महाविद्यालयाच्या निकालाची परंपरा व गुणवत्तेचा आलेख उंचावण्यासाठी संस्थेतील सर्व प्राध्यापक व कर्मचारी कोरोना संकट टळताच एमआयडीसी विभाग नव्याने कात टाकून प्रगती करू लागला आहे.

# देविदास पवारांची सेवापूर्ती: एक आनंद सोहळा

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट देविदास पवार हे भिवंडी येथील महानगरपालिकेच्या आयुक्त पदावरून सेवानिवृत्त होत आहेत. आपल्या प्रदीर्घ प्रशासकीय सेवेत प्रथम नगरपालिका मुख्याधिकारी म्हणून अंबरनाथ,बदलापूर,लातूर,परळी वैजनाथ,यवतमाळ येथे उत्तम सेवा केल्यावर पदोन्नतीने महानगर पालिकेचे आयुक्त म्हणून परभणी,अमरावती आता भिवंडी येथून सेवा निवृत्त होत आहेत. त्यांनी पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भात मोठ्या स्वाभिमानाने कर्तव्यनिष्ठपणे सेवा बजावली आहे. त्यांनी केलेल्या कार्याचा नेहमीच गौरव होत आला आहे.म्हणून त्यांच्या सेवापूर्तीचा जन्मभूमीच्या जिल्हास्तरावर गौरव व्हावा म्हणून कुटुंबीय आणि स्नेहिजणांनी नांदेडच्या कुसुम सभागृहात 01 जून 2025 रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत हा आनंददायी सोहळा आयोजित केला आहे.

देविदास पवारांची कौटुंबिक पार्श्वभूमी पाहिली तर एका मराठा कुणबी सामान्य शेतकरी, कष्टकरी परिवारातील ते आहेत. नांदेड जिल्ह्यातील मुदखेड तालुक्यातील निवघा येथील वारकरी संप्रदायातील अल्पशिक्षित पण प्रगतशील विचारांची आई गिरजाबाई व वडील गंगाधरराव पवार या सत्तशील दांपत्याच्या पोटी त्यांचा जन्म झाला. त्यांचा मोठा भाऊ सेवानिवृत्त वनाधिकारी तथा मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष शिवश्री कामाजी पवार पाठचा देविदास पवार, सकारात्मक विकासाची दृष्टी घेऊन गावगाडा, समाजकारण, राजकारण करणारे उद्धवराव पवार,आयुर्वेद तज्ञ डॉ. विश्वंभर पवार या चौघा भावाचे एकोप्याने राहून प्रगती करणारे हे एक जिल्ह्यातील आदर्श कुटुंब आहे.असेच एक कुटुंब लोहा तालुक्यातील सोनखेड येथील अँड. डी.के.हांडे यांचेही चौघा भावाचे आहे, हे मी जवळून पाहिले आहे.हांडे कुटुंबात छोट्या भावाचे तर पवार कुटुंबात मोठ्या भावाचे सगळेजन ऐकतात. हे कुटुंब मातृत्वाचा सन्मान करीत, एकमेकांचे ऐकून सामाजिक भान जपत इंजि. पुरुषोत्तमजी खेडेकर यांचे ‘नवे विचार, नवी कृती’ अंगीकारून वागत असतात.त्यांच्या माता-पित्यांचे चांगले संस्कार,वागणूक,परिश्रमाचा वसा या पुत्रांनी घेतला आहे. कुठ वाकायचं आणि कुठे ताटं होयायचे हे त्यांना समजले आहे. कुठे खर्च करायचा,कुठे करायचा नाही हे ही त्यांना समजते,म्हणून तर या कुटुंबाची आर्थिक प्रगती खूप छान झाली आहे.

देविदास पवार यांच्या जन्मगावची मातीच अन्याया विरुद्ध बंड करणारी आहे.निजामाच्या अन्याया विरोधात बंड करणारे खोडं येथे जन्माला आलीत. अज्ञान,अंधश्रद्धा,वाईट चालीरितीच्या विरोधात बंड करण्याचे धाडस मराठा सेवा संघाच्या माध्यमातून येथे आले आहे. याच मातीतले देविदास पवार हे आज पर्यंत नोकरी करीत असताना आपल्यापेक्षा वरिष्ठ अधिकारी अथवा पदाधिकारी यांच्याकडून अन्याय सहन केला नाही. नात्यातील आमदार,पुढारी असतानाही त्यांच्या नावाचा गैरवापर करून कामचुकारपणा केला नाही.उलट आपणाकडे असणाऱ्या कामकाजाचे नियंत्रण आणि अंमलबजावणी अधिक काटेकोरपणे करीत आले आहेत. आपल्या हाताखाली विविध विभागाची सुयोग्य देखरेख करीत आले आहेत. शहराला सार्वजनिक सुविधा मिळवून देण्यात त्यांचा सतत पुढाकार राहिला आहे. नागरिकांशी सतत सुसंवाद साधून त्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेत त्यांना योग्य ती माहिती देत आले आहेत. सामान्य नागरिकांच्या समस्यावर वेळच्यावेळी उपायोजना करीत आले आहेत.आपल्या हाताखालच्या प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे कामकाज पाहून त्यांना योग्य ते मार्गदर्शन



करीत आले आहेत. ज्या शहरात नोकरी केली,त्या शहरांच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे भूमिका बजावत आले आहेत.

प्रामाणिकपणे आपली नोकरी पार पाडताना त्यांनी आपल्या कुटुंबाकडे कधी दुर्लक्ष होऊ दिले नाही.या कामी त्यांची पत्नी सौ. मनीषा पवार यांनीही नेटाने जबाबदारी पार पाडत नांदेडच्या प्रसिद्ध मातोश्री प्रतिष्ठानच्या विद्यमान संचालिका म्हणून भूमिका यशस्वीपणे पार पाडत आहेत. आपल्या मुलावर संस्कारक्षम शिक्षण देण्यातही त्या कमी पडल्या नाही.

आपल्या प्रशासकीय व कौटुंबिक जबाबदारी बरोबरच आपल्या जन्मभूमीच्या जिल्हा परिषदेच्या शाळा वडीलाच्या स्मरणार्थ आपल्या उपस्थितीत संपुर्ण डिझिटल करून दिली आहे.त्यांनी शाळेला अत्यावश्यक साहित्य दिल्याचे शाळेवरील शिक्षकांनी मला सांगितले आहे.आपल्या जिल्ह्यातील सेवा बजावणाऱ्या व जिल्ह्यातील देशभर सेवा बजावणाऱ्या भूमिपुत्र असणाऱ्या सर्व खात्याच्या राजपत्रित अधिकाऱ्यांचा मागील पाच सहा वर्षांपासून नांदेड शहरात दरवर्षीच दीपावलीला स्नेह मिलन मेळाव्याच्या आयोजनात यांचे मोठे बंधू व बालाजीराव खतगावकर सारख्या मित्रां बरोबर त्यांची मोठी भूमिका असते. या कार्यक्रमात मान्यवरांच्या उपस्थितीत जिल्ह्यातील नुतन अधिकारी बनलेल्यांचाही सन्मान केला जातो. यातून एकमेकाची ओळख होते.एकमेकांचा स्वभाव समजतो. वेग वेगळ्या खात्यात समन्वय राखून जिल्ह्याचा विकास होण्यास मदत होते. अधिकाऱ्यांना काम करण्यास ऊर्जा मिळते. या कार्यक्रमास जिल्ह्याचे जिल्हाधिकारी,जिल्हा पोलीस अधिक्षक,सर्व खात्याचे कार्यकारी अधिकारी,मुख्यकार्यकारी अधिकारी,म.न.पा. आयुक्त,शिक्षणाधिकारी सर्व अधिकारी उपस्थित राहतात.यात मोठ्या अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनातून खूप काही शिकायला मिळते. यात देविदासरावांची भूमिका महत्त्वाची असते. ते अत्यंत नम्रपणे,मनमोकळेपणाने सर्वांशी बोलत सुसंवाद संवाद साधत फिरत असतात. त्यातून त्यांचा मनमोकळा स्वभाव, मला जवळून पाहता आला.

देविदासराव पवार अशा या निगर्वी,कर्तव्यदक्षपणे काम करणाऱ्या महानगरपालिका आयुक्त म्हणून सेवापूर्ती केलेल्या या व्यक्तिमत्वाचा आनंददायी सोहळा होणार आहे. शासकीय सेवापुर्ती निमित्ताने माझ्याकडून त्यांना आयुरारोग्य लाभून मानव हिताचे काम त्यांच्या हातून घडो ही सदिच्छा...!

**पंडित पवळे,नांदेड**
**मो.9890232962**

# किनवट येथे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात साजरी

## शहरात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचे स्मारक बांधण्याची समाज बांधवांची मागणी

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट किनवट : राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची स्त्रीशताब्दी जयंती किनवट शहरात मोठ्या संख्येने उत्साहात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाचे अध्यक्ष आमदार भीमराव केराम उद्घाटक बेबीताई प्रदीप नाईक व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. शिवसेना जिल्हाप्रमुख ज्योतिबा खराटे,भाजपा जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख माजी नगराध्यक्ष के मूर्ती माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, माहूरचे नगराध्यक्ष फिरोज दोसानी, बाजार समितीचे सभापती गजानन मुंडे,सुधाकर भोयर,समाधान जाधव ,अनिल पाटील कऱ्हाळे,सुनील पाटील,प्रवीण म्याकलवार,प्रकाश राठोड मारोती सुंकलवार,



राम पाटील, राहुल नाईक,शिवसेना तालुकाप्रमुख मारुती दिवसे पाटील,वैजनाथ करपुडे पाटील, सुरज सातुरवार, गिरीश नेम्मानिवार,बाळकृष्ण कदम,उपसरपंच राजू सुरोसे,बाबुराव भिंगे,सागरताई शिंदे,अतुल दर्शनवाढ,सचिन कदम,प्रशांत मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी जयंती उत्सव समिती व आयोजक तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक,बालाजी बामणे आरोग्य धूत अमन कुंडगीर,आशुतोष ठोबरे, माधव नरोटे,मनोहर श्रीरामे, शिवम देवकाते,संग्राम शेवाळे,सुमित नरोटे, विनोद देवगुडे,दया कवाडे,सुरज चामणार, मंगेश गडदे, बळी शिंदे,अकाश कुंडगीर पत्रकार प्रदीप वाकोडीकर,पत्रकार संघटनेचे अध्यक्ष प्रमोद पोहरकर ,दुर्गादास राठोड,नासिर तगले,किरण ठाकरे, मिलिंद सर्प,गोकुळ भवरे ,गंगाधर कदम यांच्यासह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. समाज बांधवांच्या वतीने बालाजी बामणे यांनी किनवट शहरात राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे भव्य स्मारक करण्याची मागणी मा.आमदार केराम केली असता अध्यक्षीय समारोपाप्रसंगी आ.केराम यांनी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या भव्य स्मारकासाठी जागा उपलब्ध करून देऊ अशी शाश्वती समाज बांधवांना दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमेश मुंडकरयांनी तर आभार अमन कुंडगीर यांनी मानले.

# मुख्यमंत्री असो वा उपमुख्यमंत्र्यांच्या ताटात जेवणारा माणूस असू दे, त्याची चूक झाली असेल तर तो गजाआड जाईल

भाजपाच्या फायरब्रांड नेत्या चित्रा वाघ यांनी वैष्णवी हगवणे प्रकरणात कोणाचीही गय केली जाणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. या प्रकरणातील कोणाही सोडले जाणार नाही हे सांगताना त्यांनी पार मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या ताटाच जेवणारा जरी माणूस यात असेल तरी त्याला सोडले जाणार नाही अशी डरकाळीच चित्रा वाघ यांनी फोडली आहे. 21 व्या शतकात हरामखोर सासू सासरे वैष्णवीचे ताटात जेवणारा माणूस असू दे,ताटात जेवणारा माणूस असू दे,सासू सासरे तर मला 21 व्या शतकातील हरामखोर सासू सासरे दिसत आहेत. मला त्याचा प्रचंड संताप येतोय. वैष्णवी हीचा मेल्यानंतरही वनवास संपलेला नाही. बाईच्या नशीबी संघर्ष मेल्यानंतरही आहेच. हरामखोर लांडगे लचके तोडत आहेत. आपली सामाजिक जागृती करण्याचा जबाबदारी आहे. वैष्णवी हगणवे यांच्यानंतरही अनेक केसेस पुढे आलेल्या आहेत. पोलिस आरोपींना पकडत आहेत असेही चित्रा वाघ यांनी म्हटले आहे. पूजा तर तीन ते चार महिन्यांची गरोदर होती वैष्णवी मृत्यू प्रकरणातील एका आरोपीला नेपाळसीमेवरुन पोलीसांनी पकडून आणले आहे. त्याबद्दल त्या म्हणाल्या पोलीस आरोपींना पकडून आणण्याचं काम करत आहेत. आणखी एक हुंडाबळी पूजा हीला तर गरोदर असताना आपला जीव गमवावा लागला आहे. ती तीन ते चार महिन्याची गरोदर होती असेही वाघ यांनी म्हटले आहे. कुटुंबियांनी जे वकीलांना सांगितलं त्यांच्यावर कारवाई होणार आहे. आरोपींना मरेपर्यंत फाशीची शिक्षा होणार आहे. सुपेकर यांची दुसरीकडे बदली करण्यात येणार आहे.वैष्णवी प्रकरणातील मारेक-यांना शिक्षा होईल. वैष्णवी मेल्यानंतरही तिचे लचके तोडायचं आहेत. वैष्णवीचा वनवास संपलेला आहे. आपण सामाजिक जागृती करण्याची गरज आहे. वैष्णवी हगवणे यांच्यानंतर अनेक



केसेस पुढे आलेल्या आहेत. मयुरी जगताप प्रकरणात महिला आयोग नाही तर इतर यंत्रणांची चौकशी व्हायला पाहिजे. पोलिस , महिला आयोग , भरोसा सेल असेल कुणीही कसूर केली असेल तरी कारवाई होणारच. महिला आयोगाने जर कारवाई केली नाही तरी त्यांच्यावर कारवाई होईल असेही वाघ यांनी म्हटले आहे. ताटात जेवणारा माणूस असू दे...त्यालाही... मुख्यमंत्र्यांकडून महिला आयोगाने या प्रकरणात नेमकं काय केले त्यांची चौकशी केली जाईल. त्यानंतर महिला आयोगाची चौकशी होणार आहे, हे देवाभाऊ कोणालाच सोडणार नाहीत. मुख्यमंत्री असो वा उपमुख्यमंत्र्यांच्या ताटात जेवणारा माणूस असू दे, त्याची चूक झाली असेल तर तो गजाआड जाईल असेच रूपाली चाकणकर याचं नाव न घेता चित्रा वाघ यांनी म्हटले आहे. मला खूप सारे मेसेज येत आहेत हे देवाभाऊचं सरकार आहे, कोणालाही सोडणार नाही. यात एकाचा बळी केलेला आहे. वैष्णवी असो वा गुजराती असेल तर सर्वांना न्याय मिळावा. खूप सारे मेसेज मला येत आहेत. मला फोन देखील येत आहेत, त्यामुळे कोणालाच सोडले जाणार नाही असेही चित्रा वाघ यांनी म्हटले आहे.

बीड/महाराष्ट्र
विशेष वार्ता

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

रविवार १ जून २०२५
https://lokaarambh.com





वाराणसी येथील काशिविश्वेनाथ श्री महादेव मंदिर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मारकास पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केल्या प्रसंगी जगदीश गुरखुदे(भाजपा शहरध्येक्ष तथा नगरसेवक बीड द्वारकाधीश मित्र मंडळ बीड)

# बीड शहरातील मुख्य रस्त्यावर नगरपालिकेच्या वतीने वृक्ष लागवड करावी

## भाजपा नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील



बीड प्रतिनिधी बीड शहरातील मुख्य रस्त्यावर बीड नगरपालिकेने वृक्ष लागवड करून बीड शहरातील पर्यावरण वाढवावे जेणेकरून भविष्यामध्ये पाऊस शहरांमध्ये चांगला पडेल आणि शहरांमध्ये कुठेही पाण्याची कमतरता भासणार नाही आणि वृक्ष लावल्यानंतर वृक्षाचे संगोपन देखील ज्या ज्या ठिकाणी वृक्ष नगरपालिकेच्या वतीने लावण्यात येतील त्या त्या ठिकाणच्या नागरिकाने त्या वृक्षाची दक्षता घ्यावी व त्याचे रक्षण करावे व बीड जिल्ह्यातील मानवतेचा एक आगळावेगळा संदेश इतर महाराष्ट्रातील शहरांना देखील घेण्यासारखा वाटेल असे कार्य करावे बीड नगर परिषदेच्या वतीने वृक्ष लागवड करण्यात यावी अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी एका प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे म्हटले आहे महाराष्ट्र शासन देखील सांगत आहे की झाडे लावा झाडे जगवा आणि संत देखील सांगतात की वृक्षवल्ली आम्हा सोयरे ही वनचरे या न्यायाप्रमाणे बीड नगर परिषदेच्या वतीने बीड शहरातील मुख्य रस्त्यावर वृक्ष लागवड करून बीड शहरातील पर्यावरण राखण्यासाठी नक्कीच मदत होईल आणि बीड शहराचे या वृक्षाने अतिशय सुशोभीतीकरण झाल्यासारखे दिसेल

# दणदणाट करणाऱ्या DJ वर दंडात्मक कारवाई..

## बीड शहर पोलिसांची कामगिरी.



बीड शहर पोलिसांनी मोठ्या आवाजात स्पीकर लाऊन दणदणाट करणाऱ्या DJ वर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. वाहन क्रमांक MH20 AT 2229, मालक शेख सय्यद शेख वाजेद, राहणार खरसुंडी तालुका जिल्हा बीड, यांना 69000/- रुपये दंड आकारण्यात आला आहे.

सदरील कारवाई पोलीस अधीक्षक श्री नवनीत काँवत, अपर पोलिस अधीक्षक श्री सचिन पांडकर, यांचे सूचना प्रमाणे पोलिस निरीक्षक श्री.शीतलकुमार बल्लाळ, सपोनी श्री. बाबा राठोड, पोलीस नाईक जायभाय, पोलीस हवालदार गरजे, पोलीस हवालदार शौकत, पोलीस शिपाई मनोज परजणे यांनी कारवाई केली आहे.

# एलसीबीच्या प्रमुखपदी शिवाजी बंटेवाड



बीड-येथील स्थानिक गुन्हे शाखेच्या प्रमुखपदी अखेर ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांची वर्णी लागली आहे. पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांनी याबाबत आदेश जारी केलेत. उस्मान शेख यांची लातूरला बदली झाल्यानंतर अनेकांच्या नावाच्या चर्चा सुरु होत्या. अखेर एलसीबीच्या प्रमुखपदी श्री. बंटेवाड हे कारभार पाहणार असल्याचे आता स्पष्ट झाले आहे.

# बिंदुसरा धरणात अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या धोक्या विषयी तातडीने उपाययोजना करावी - अनिल जगताप

बीड, प्रतिनिधी मागील काही महिन्यांतील अतिवृष्टीमुळे बिंदुसरा धरण ओसंडून वाहत आहे. त्यामुळे बीड शहरासह परिसरातील नागरिकांच्या सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांचे जीवित आणि मालमत्तेचे नुकसान टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी बीड जिल्हाधिकारी आणि नगर परिषद बीडचे मुख्याधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनामध्ये धरण परिसरात प्रवेशबंदी करावी, धरणातून सोडण्यात येणाऱ्या पाण्याचे नियोजनबद्ध नियमन करावे, नागरिकांना पूर्वसूचना देण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवावी,



संभाव्य पूरग्रस्त भागात जिल्हा प्रशासनाने वेळेवर माहिती द्यावी, ग्रामीण भागात मदत व बचाव कार्यासाठी यंत्रणा तत्पर ठेवावी अशी मागणी करण्यात आली आहे. सध्याची परिस्थिती पाहता भविष्यात मोठ्या दुर्घटनेची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रशासनाने तातडीने कृती करावी. असेही शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी निवेदनामध्ये नमूद केले आहे.

# अमरावती जिल्हा मेळघाट तालुक्यातील आठ आदिवासी गावातील हजारो आदिवासी बांधवांचे विस्थापन

मानोरा: दिनांक ३० मे २०२५ रोजी राष्ट्रीय आदिवासी एकता परिषद तथा राष्ट्रीय आदिवासी छात्र संघाच्या वतीने अमरावती जिल्ह्यातील मेळघाट तालुक्यातील आठ आदिवासी गावातील हजारो आदिवासी बांधवांचे विस्थापन करून अनेक प्रकारच्या समस्या सरकारने निर्माण केले आहे तसेच त्यांच्यावर अनेक प्रकारचे अन्याय अत्याचार कित्येक वर्षापासून होत आहे यासाठी राष्ट्रीय आदिवासी एकता परिषदेने वारंवार सरकारच्या विरोधामध्ये आंदोलने केली यावेळेस सुद्धा पाच टप्प्यातील चरण बद्ध आंदोलन लावलेली आहे या आंदोलनाचा दुसरा टप्पा दिनांक ३० मे २०२५ रोजी महाराष्ट्रातील ३६ जिल्हे आणि ३५८ तालुक्यात एकाच दिवशी माननीय तहसीलदार यांच्यामार्फत महामही राष्ट्रपती यांना निवेदन देण्यात आले यावेळी राष्ट्रीय



आदिवासी एकता परिषदचे वाशिम जिल्हा संयोजक गजानन गंडाळे यांच्या नेतृत्वामध्ये मानोरा तहसील येथे निवेदन देण्यात आले यावेळी गजानन भाऊ डोलारकर अफ्रोट संघटना तालुका अध्यक्ष, क्रांतिवीर बिरसा मुंडा संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष गोलू भाऊ वाळले, सामाजिक कार्यकर्ते निखिल अंभोरे, क्रांतिवीर बिरसा मुंडा संघटनेचे वाशिम जिल्हा अध्यक्ष रवी भाऊ पकमोडे, सामाजिक कार्यकर्ते महादेव बुचके, गजानन गिरे इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

# भिरवंडेकर गाणं कोकिळा महिलांनी गाजवल

मुंबई(दै. प्रजा-शासन प्रतिनिधी-गुरूनाथ तिरपणकर) मालवणी भाषा ही जगाच्या पाठीवर नेऊन ठेवली ती म्हणजे कै मच्छिंद्र कांबळी यांनी. आणि त्याच मालवणी भाषेत संपूर्ण कोकण दर्शन घडवलं गीतकार संगीतकार ध्वनिमुद्रक श्री श्रीकृष्ण सावंत यांनी. साध्या सोप्या सरळ मालवणी भाषेत प्रत्येक कोकणी माणसाला आवडेल असे गीत संपूर्ण महाराष्ट्राने उचलून धरलं. मागील वर्षी कनेडी विद्यामंदिरच्या माजी विद्यार्थी संमेलनात या गीताच सादरीकरण झालं. आणि सोशल मीडियावर या गाण्याने धुमाकूळ घातला. कणकवली तालुक्यातील भिरवंडे गावामधील महिला गायकांनी ते



गायलं असून त्याच गावच्या महिला कलाकारांनी हे गीत साकारल. सौ उज्वला सुकाळी यांनी या गीताच नृत्य दिग्दर्शन केलं. सौ दिपाली सावंत सौ कल्याणी वाक्कर यांनी या गीतासाठी प्रचंड मेहनत घेतली. रंजना सावंत, साक्षी सावंत, निधी सावंत, उज्वला सुकाळी, शुभांगी सावंत यांनी हे गीत गायलं. गावामधील 42 महिला या गाण्यात सहभागी झाल्या. हे गीत साकारण्यात श्री श्रीकृष्ण सावंत यांचा मोलाचा वाटा आहे. या गीतामुळे कोकणचे नाव सातासमुद्रापार गेले यात शंकाच नाही.सर्व महाराष्ट्रातून या गीताची प्रशंसा होत आहे. आणि त्याचे सर्व श्रेय हे श्रीकृष्ण सावंत आणि सर्व भिरवंडेकर महिलांचे आहे. हे गीत प्रत्येक कोकणी माणूस गुणगुणत आहे. आमचो कोकण या मालवणी गीतामध्ये सौ.सुप्रिया सावंत,सौ. धनश्री सावंत,सौ.अंकिता सावंत.सौ.राजश्री सावंत,सौ.श्रद्धा सावंत,सौ.विना सावंत,सौ. दीपा सावंत,सौ.निधी सावंत,सौ.समिक्षा सावंत,सौ.मयुरी सातार्डेकर ,सौ. हर्षदा सावंत. या भिरवंडेकर महिलांनी नृत्य आणि गायन या कलाविष्काराने 'आमचो कोकण'ही गीत सर्वांगसुदर करुन जगाच्या पाठीवर अजरामर केले त्याचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.

# साहित्य गौरव सोहळ्यात सौ. प्रांजली काळबेंडे यांचा सन्मान

अजिंक्य साहित्यसंमेलन व पुरस्कार वितरण सोहळा संपन्न सातारा जिल्ह्यातील कोडोली (ता. कराड) येथे रविवारी, ११ मे रोजी 'अजिंक्य साहित्यसंमेलन' व राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात पार पडला. ग्रंथ दिंडीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. १५० पेक्षा अधिक साहित्यिकांच्या सहभागाने समारंभाची शोभा वाढली. पलपब पब्लिकेशन्सच्या सर्वेसर्वा मा.लिना पाटिल ताई यांनी प्रास्ताविक मांडले. सातारा येथील कोडोलीत पार पडलेल्या 'अजिंक्य साहित्यसंगम राज्यस्तरीय साहित्य संमेलन व पुरस्कार वितरण सोहळ्या'मध्ये पलपब पब्लिकेशनचे सक्रीय योगदान ठळकपणे जाणवले. कार्यक्रमाचे प्रमुख संयोजन पलपब सातारा कमिटीने केले होते. या प्रसंगी जेष्ठ लेखक, सुरेश शिंगटे, जेष्ठ लेखक अनिल बोधे, जेष्ठ कवयित्री रेखा दिक्षित, कवी, लेखक प्रदिप कांबळे, पाठ्यपुस्तकातील कवी हनुमंत चांदगुडे,मा. सिध्दार्थ पाटील,कवी विजय कदम,अनिता नलगे , जेष्ठ लेखक गणपतराव कणसे,प्रतिक मतकर, कवी, विजय वेटम, हे मान्यवर उपस्थित होते पलपब पब्लिकेशनच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. लीना ताई पाटील , पलपब महाराष्ट्र अध्यक्ष मा. किरण तोडकर सुर्यवंशी पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष मा. संदीप पवार, यांच्या मार्गदर्शनाखाली संमेलनाचे आयोजन अत्यंत यशस्वीरीत्या पार पडले. त्यांच्या सहकार्यामुळे साहित्यिक आणि कवींसाठी हे व्यासपीठ प्रेरणादायी ठरले. या कार्यक्रमात विविध पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये लेखक, कवी, संपादक, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार यांचा



समावेश होता. दीपप्रज्वलन व स्वागतपर भाषणानंतर सन्मानचिन्ह व प्रमाणपत्राद्वारे मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. २०२४ मध्ये प्रकाशित झालेल्या ई-बुक दिवाळी अंकामध्ये राज्यभरातील कवी, लेखक यांनी कविता, लेख, निबंध पाठवून सहभाग नोंदवला होता. या लेखनांचे परीक्षण करून गुणवत्ता आणि आशयाच्या आधारे क्रमांक निश्चित करण्यात आले. या स्पर्धेत वसईच्या सुप्रसिद्ध कवयित्री सौ. प्रांजली प्रविण काळबेंडे (काव्यप्रांजू) यांच्या लेखाला द्वितीय क्रमांक मिळाला. त्यांच्या उल्लेखनीय साहित्यिक योगदानासाठी त्यांना सन्मानपत्र व सन्मानचिन्ह प्रदान करून गौरविण्यात आले. या कार्यक्रमात केवळ पुस्तक प्रकाशनच नव्हे तर राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळाही पार पडला. यामध्ये "पलपब प्राईड ऑफ भारत", "एक्सलन्स अवॉर्ड", "साहित्य भूषण", "साहित्य प्रेरणा", "साहित्य साधना जीवन गौरव", "संत गाथा" अशा विविध पुरस्कारांनी विविध क्षेत्रातील मान्यवरांना सन्मानित करण्यात आले.

# विद्यार्थ्यांनो , व्यसन नको - विजयी व्हा !! एक पाऊल पुढे टाका - स्वत:च आणि देशाचं आरोग्य वाचवा

. □ तंबाखू सेवनाला 'नाही' म्हणा ! □ आपल्या मित्रांना व्यसनमुक्तीसाठी प्रेरित करा □ तंबाखूमुक्त भारतासाठी पुढे या !31 मे : जागतिक तंबाखूविरोधी दिनतंबाखू म्हणजे काय ? : - तंबाखू ही एक प्रकारची वनस्पती आहे ( निकोटीना टॅबुकुमा ) , जिच्या पानांमध्ये निकोटीन हे व्यसन निर्माण करणारे रसायन असते . ती सुकवून धूम्रपान , गुटखा , खर्रा , मावा , मिश्री अशा अनेक प्रकारांमध्ये वापरली जाते .तंबाखूचे उपयोग : - पूर्वी पारंपरिक औषधांमध्ये , कीटकनाशक म्हणून काही प्रमाणात , धार्मिक विधींमध्ये ( काही भागांत ) वापर होई ; औद्योगिक वापर – धूम्रपान , गुटखा , सिगारेट , बीडी यासाठी तंबाखू वापरली जाते .तंबाखूवर आधारित उद्योग :- सिगारेट आणि बीडी उत्पादन करणाऱ्या कंपन्या , गुटखा व तंबाखू मिश्रित सुपारी कंपन्या , मिश्री उत्पादन उद्योगात , प्रक्रिया व पॅकेजिंग उद्योगात तंबाखू वापरली जाते . तंबाखूचा इतिहास : - तंबाखूचा वापर हजारो वर्षांपूर्वी अमेरिकन खंडात सुरू झाला . युरोपियन लोकांनी 16 व्या शतकात तंबाखू युरोपमध्ये आणली . भारतात मुघल काळात तंबाखूचा प्रसार झाला . चीन हा सर्वात मोठा उत्पादक देश असून भारत , ब्राझील , अमेरिका , इंडोनेशिया , झिम्बाब्वे हे तंबाखू उत्पादन करणारे विविध देश आहेत . महाराष्ट्रात तंबाखू उत्पादन मुख्यत: विदर्भ व मराठवाडा या भागात होते . यवतमाळ , अमरावती , बुलढाणा , नागपूर , चंद्रपूर , बीड , नांदेड या जिल्ह्यात मुख्यता उत्पन्न होणाऱ्या तंबाखूचे प्रकार पुढीलप्रमाणे आहेत . 1) बीडी तंबाखू : महाराष्ट्रात प्रामुख्याने याच प्रकाराची लागवड केली जाते . 2) चिखली तंबाखू – बुलढाण्यातील एक विशेष प्रकार आहे . 3 ) गुल तंबाखू – मिश्रीसाठी हा प्रकार वापरला जातो . तंबाखूचे दुष्परिणाम : निकोटीनमुळे व्यसन लागते . हृदयविकार , फुफ्फुसाचे आजार , तोंडाचा , घशाचा, फुप्फुसाचा कर्करोग होऊ शकतो . याशिवाय अपचन , त्वचेचे आजार व इतर अनेक हानिकारक परिणाम होतात . तंबाखूच्या सेवनामुळे होणारे विविध आजार व उपाय : - तंबाखूच्या सेवनामुळे कर्करोग , टीबी , सी ओ पी डी (फुफ्फुस विकार ) , दात व हिरड्यांचे आजार , गर्भपात / अपत्यांवर परिणाम होऊ शकतो . यावर उपाय म्हणून व्यसनमुक्ती केंद्रात उपचार केले जाऊ शकतात , यासह निकोटीन रिप्लेसमेंट थेरपी , मानसोपचार सल्ला , योग व ध्यान इत्यादी उपाय केले जाऊ शकतात . भारतात तंबाखूसेवन विरोधी कायदे सुद्धा आहेत . उदा. सी ओ टी पी ए कायदा , 2003 - या कायद्यानुसार सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान निषिद्ध असून सिगारेट व इतर तंबाखू युक्त पदार्थांच्या उत्पादनावर बंधनासाठी हा कायदा आहे . अनेक राज्यांमध्ये गुटखा बंदी आहे . तंबाखू उत्पादने विक्रीवर वयोमर्यादा ही अठरा वर्ष ठरविण्यात आली आहे . पॅकेजिंगवर इशारे आणि चित्र बंधनकारक आहे . शाळा-कॉलेज परिसरात विक्रीवर बंदी आहे . याशिवाय भारत सरकारच्या अनेक उपाययोजना आहेत . यात मुख्यता एन टी सी पी प्रोग्राम - नॅशनल टोबॅको कंट्रोल प्रोग्राम




असून मोफत हेल्पलाइन 1800-11-2356 हा आहे . याशिवाय प्रबोधन मोहिमा व जनजागृती , शालेय स्तरावर प्रशिक्षण कार्यक्रम , तंबाखू मुक्त शाळा अभियान इत्यादी उपक्रम राबविले जातात . जागतिक तंबाखू विरोधी दिनाचा इतिहास :- हा दिवस दरवर्षी 31 मे रोजी साजरा केला जातो . 1987 मध्ये WHO ( जागतिक आरोग्य संघटना ) ने प्रथम हा दिवस जाहीर केला .हा दिवस का साजरा केला जातो ? :- तंबाखूच्या दुष्परिणामांबद्दल जनजागृती करणे , तंबाखूमुक्त जीवनशैलीचा प्रचार व प्रसार करणे , सरकार व समाज यांच्यातील सामंजस्य वाढवणे , युवकांना व्यसनांपासून दूर ठेवणे हा या मागचा मुख्य उद्देश आहे . महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आवाहन :- तंबाखू सेवनाला " नकार " द्या . मित्रांना व्यसनमुक्तीसाठी प्रेरित करा . सोशल मिडिया द्वारे जनजागृती करा . महाविद्यालयात प्रबोधन उपक्रम राबवा . स्वयंसेवक म्हणून काम करा .31 मे या दिवशी होणारे कार्यक्रम :- व्याख्याने व कार्यशाळा आयोजित केल्या जातात . जनजागृती रॅली , पोस्टर व निबंध स्पर्धा , डॉक्युमेंटरी फिल्म स्क्रीनिंग , तंबाखूमुक्ती प्रमाणपत्र वाटप इ उपक्रम राबविले जातात . 2025 सालची थीम ( घोषवाक्य ) :- तंबाखू विरोधी लोकांमध्ये जनजागृती व्हावी या उद्देशाने यावर्षीचे घोषवाक्य " प्रोटेक्टिंग चिल्ड्रेन फ्रॉम टोबॅक्को इंडस्ट्री इंटरफरन्स " ( तंबाखू उद्योगाच्या हस्तक्षेपापासून मुलांचे संरक्षण ) हे आहे . जागतिक तंबाखू विरोधी दिन हा आरोग्य , शिक्षण , आणि समाज प्रबोधनाचा एक महत्वाचा भाग आहे . तंबाखूमुळे होणारे आजार आणि त्याचे दुष्परिणाम टाळण्यासाठी समाजात व्यापक जनजागृती होणे अत्यावश्यक आहे . आपण सर्वांनी तंबाखूविरोधी लढ्यात सामील होऊन , एक निरोगी आणि व्यसनमुक्त समाज निर्माण करायला मदत करावी .

**चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके तहसीलदार , बीड .**



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

## आंतरराष्ट्रीय



# पाकिस्तानवर आली तालिबानचे पाय पकडण्याची वेळ, भारताच्या भितीने घेतला मोठा निर्णय

ऑपरेशन सिंदूरद्वारे दक्षिण आशियात भारताने पाकिस्तानला पूर्णपणे बॅकफूटवर ढकललं आहे. लष्करी आणि कूटनिती दोघांमध्ये भारताने पाकिस्तानला चांगलच कुटून काढलय. भारताच्या वाढत्या वर्चस्वाने पाकिस्तान हैराण झाला आहे. पाकिस्तानचा जिहादी मानसिकतेचा लष्कर प्रमुख आसिम मुनीरने पुन्हा एकदा भारताविरोधात गरळ ओकली आहे. इस्लामाबाद दक्षिण आशियामध्ये भारताचा वर्चस्व कधीच मान्य करणार नाही, असं त्याने म्हटलय. पाकिस्तान इतका हडबडून गेलाय की, काहीही करुन त्यांना शेजारच्या अफगाणिस्तानसोबत चांगले संबंध हवे आहेत. आपली स्थिती भक्कम करण्यासाठी पाकिस्तान काहीही करायला तयार आहे. पाकिस्तानने काबूलमध्ये आपली कूटनितीक उपस्थित वाढवण्याची घोषणा केली आहे. पाकिस्तानने काबूलमध्ये आपल्या दूतावासाचा स्तर वाढवून एम्बेसडर-लेवलवर घेऊन जाण्याचा निर्णय घेतला आहे. पाकिस्तानचा हा निर्णय म्हणजे, त्यांना अफगाणिस्तानसोबत चांगले संबंध हवेच आहेत, पण त्याच बरोबर भारताच्या भितीपोटी त्यांनी



हे पाऊल उचललय. मागच्या काही महिन्यात पाकिस्तान-अफगाणिस्तान सीमेवर बऱ्याच लढाया झाल्या आहेत.

### दूतावास उघडण्याचा निर्णय का घेतला?

काबूलमध्ये पाकिस्तानने डिप्लोमॅटिक उपस्थिती एम्बेसडर-लेव्हलपर्यंत नाही नेली, तर भारताच्या प्रभावाखाली अफगाणिस्तानच्या राजकारणात आणि आर्थिक क्षेत्रात पाकिस्तानची भागीदारी कमकुवत होईल. याच राजकीय रणनिती अंतर्गत पाकिस्तानने काबूलमध्ये दूतावास उघडण्याचा निर्णय घेतला आहे.

भारताने आता अफगाणिस्तानच्या तालिबान राजवटीसोबत चांगले संबंध प्रस्थापित केलेत. आता अफगाणिस्तानला भारताच्या जवळ जाण्यापासून रोखण्यासाठी पाकिस्तानने हा निर्णय घेतला आहे. पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री काय म्हणाले? पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री इशाक डार म्हणाले की, "काबूलमधील सध्याची चार्जे डी'एफेयरची स्थिती एम्बेसडर-लेव्हलमध्ये बदलणं पाकिस्तान-अफगाणिस्तान संबंध सुधारणेसाठी आवश्यक आहे"

# पाकिस्तानचा जिहादी आर्मी चीफ आसिम मुनीरचे भारताबद्दल विषारी शब्द, आता बोलतो?


पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने जी सैन्य कारवाई केली, त्याने पाकिस्तानला त्यांची लायकी दाखवून दिली. 7 ते 10 मे या चार दिवसाच्या लढाईत पाकिस्तानने भारताकडून जबर मार खाल्ला. पाकिस्तानची सैन्य प्रतिष्ठा धुळीस मिळाली. मात्र, त्यानंतरही पाकिस्तानला अक्कल आलेली नाही. पाकिस्तानचा जिहादी मानसिकतेचा लष्कर प्रमुख आसिम मुनीरने पुन्हा एकदा भारताविरोधात गरळ ओकली आहे. इस्लामाबाद दक्षिण आशियामध्ये भारताचा वर्चस्व कधीच मान्य करणार नाही, असं आसिन मुनीरने म्हटलं आहे. हरल्यानंतर स्वत:ला फिल्ड मार्शल पदवी लावून घेणारा आसिम मुनीर हा पहिलाच लष्करप्रमुख असावा. भारताने सिंधू जल करार स्थगित करुन पाकिस्तानची चांगलीच कोंडी केली आहे. भारताने केलेल्या या वॉटर स्ट्राइकचे परिणाम आता दिसू लागले आहेत.



पाकिस्तानची जलकोंडी सुरु झाली आहे. त्यामुळे पाकिस्तानातून पुन्हा आक्रमक भाषा सुरु झालीय.

"पाकिस्तान सिंधू जल कराराच्या मुद्यावर कधीच तडजोड करणार नाही. कारण हा विषय थेट देशातील 24 कोटी नागरिकांच्या अधिकाराचा विषय आहे" असं आसिम मुनीर म्हणाला. पाकिस्तानी सैन्याची मीडिया विंग विंग इंटर सर्विसेज पब्लिक रिलेशंस (ISPR) नुसार, आसिम मुनीरने ही टिप्पणी विविध विश्वविद्यालयाचे कुलपती, मुख्याध्यापक, वरिष्ठ शिक्षक आणि शिक्षणतज्ज्ञांसोबत चर्चा करताना केली.'पाण्याच्या विषयावर कधीच झुकणार नाही' सिंधू जल करार स्थगित करण्याच्या भारताच्या निर्णयावर प्रतिक्रिया देताना आसिम मुनीरने ही पाकिस्तानसाठी लक्ष्मण रेखा असल्याच म्हटलं. इस्लामाबाद पाण्याच्या विषयावर कधीच झुकणार नाही, असही मुनीर म्हणाला. "पाणी पाकिस्तानची रेड लाइन आहे. आम्ही 24 कोटी पाकिस्तानींच्या या मौलिक अधिकारावर कोणतीही तडजोड करणार नाही"

### या दक्षिणमुखी मंदिरासाठी दोन्ही देशातील सैन्यात झडतात चकमकी, 800 वर्षांच्या वारशासाठी दोन्ही देशात तणाव



कंबोडिया आणि थायलँड सीमेवर एका पुरातन मंदिरासाठी दोन देशात वातावरण तणावग्रस्त आहे. हे मंदिर सुमारे ८०० वर्षे जुने असून भगवान शंकराचे हे मंदिर आहे. हे कोणतेही साधारण मंदिर नाही. ते भौगोलिक , धार्मिक आणि ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्वाचे आहे. दशकाहून अधिक काळ या मंदिरासाठी दोन्ही देशात वाद सुरु आहे. या मंदिराच्या सीमेवर सैनिक तैनात असून गोळीबारात एका कंबोडियन सैनिकाचा जीवही गेला आहे. या घटनेनंतर कंबोडियाचे पंतप्रधान हुन मानेट यांनी जनतेला शांततेचे आवाहन केले आहे. दोन्ही देशात या मंदिराने युद्धाची स्थिती काय असते ते पाहूयात... मंदिरचा वाद नेमका काय ?हे मंदिर प्रसात ता मोएन थॉम मंदिर डांगरेक पर्वतावर उभे आहे. हे भाग कंबोडियाच्या ओडार मींचे प्रांत आणि थायलंडच्या सुरिन प्रांताच्या सीमेवर आहे.या क्षेत्राची सीमारेषा आतापर्यंत निश्चित झालेली नाही. ज्यामुळे दोन्ही देश यास भागाला स्वत:चे मानत आहेत. या अनिश्चितेमुळे हे मंदिराच्या परिसरात कायम सैन्य तैनाती ठेवावी लागत आहे. येथे कायम दोन्ही सैन्यात चकमकी झडत असतात.दोन्ही देशाचे सैनिक येथे एकमेकांसमोर येतात आणि गोळीबार सुरु होतो.

### ऑपरेशन सिंदूर शिगेला पोहोचला असताना अचानक शस्त्रसंधी का?



भारताने पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानला धडा शिकवण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी ऑपरेशन सिंदूर राबवण्यात आले. ऑपरेशन सिंदूर शिगेला पोहचला असताना १० मे रोजी संध्याकाळी भारत आणि पाकिस्तानमध्ये अचानक शस्त्रसंधीची घोषणा झाली. या निर्णयाबद्दल अनेकांना आश्चर्य वाटले. जनतेच्या मनात हा प्रश्न निर्माण झाला की इतक्या लवकर हा निर्णय का घेण्यात आला. काय म्हणाले सीडीएस अनिल चौहान? शस्त्रसंधीच्या निर्णयास सुमारे २० दिवस झाले. त्यानंतर आता याबद्दल स्पष्टीकरण आले आहे. शनिवारी सिंगापूरमध्ये झालेल्या शांग्री-ला संवादमध्ये सीडीएस जनरल अनिल चौहान यांनी त्याचे कारण स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, भारताने हे पाऊल उचलण्यामागे रणनीतीचा भाग आहे. भारताने तीन दिवसांत आपले ठरवलेले सर्व लक्ष्य साध्य केले होते. यामुळे कारवाई थांबवणे योग्य पाऊल आहे.

# दहशतवादी लखवी कारागृहात असताना बाप बनला: ओवैसी यांनी अल्जीरियामध्ये पाकिस्तानची केली पोलखोल


ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन म्हणजे एआयएमआयएमचे प्रमुख खासदार असदुद्दीन ओवैसी अल्जीरिया दौऱ्यावर आहेत. पाकिस्तानचा दहशतवादी चेहरा जगासमोर आणण्यासाठी केंद्र सरकारचे शिष्टमंडळ परदेश दौऱ्यावर आहे. त्यातील एका शिष्टमंडळात ओवैसी यांचाही समावेश आहे. भाजप खासदार बैजयंत पांडा यांच्या नेतृत्वात हे सर्वपक्षीय शिष्टमंडळ उत्तर अफ्रिकेतील अल्जीरियात दाखल झाले आहे. या शिष्टमंडळाने पाकिस्तानची पोलखोल अल्जीरियात



केली.ओवैसी सर्वपक्षीय शिष्टमंडळात अल्जीरियात गेले आहे. त्यांनी अल्जीरियातून पाकिस्तानवर जोरदार हल्ला करत शाहबाज सरकारचा खरा चेहरा जगासमोर आणला. ओवैसी म्हणाले, इस्लामाबाद दहशतवाद्यांना पाठिंबा देण्याचे धोरण अवलंबत आला आहे. त्यामुळे दक्षिण आशियात अशांतता निर्माण झाली आहे. जकीउर रहमान लखवी नावाचा दहशतवादी पाकिस्तानात आहे. तो कारागृहात असताना बाप बनला आहे. जगभरात कुठेही दहशतवाद्याचा आरोप असणाऱ्या व्यक्तीला कारागृहाच्या बाहेर जात येत नाही. परंतु लखवी कारागृहात असताना एका मुलाचा बाप बनला. त्यानंतर पाकिस्तान ग्रे लिस्टमध्ये जाण्याचा धोका निर्माण झाला. यामुळे लखवीवरील खटला पुढे सुरु झाला. सांसद असदुद्दीन ओवैसी यांनी म्हटले, भारत आणि अल्जीरियाने नोव्हेंबर 2024 मध्ये एका करारावर सही केली होती. त्या करारानुसार दोन्ही देश पुढे जातील, अशी मला खात्री आहे. दोन्ही देशांचे संबंध अधिक मजबूत होतील. आमचे पंतप्रधान लवकरच अल्जीरियात येतील. तसेच अल्जीरियाचे राष्ट्रपतीही भारतात येतील, अशी मला अपेक्षा आहे. आमच्याकडे 2018 मधील अनुभव आहे. त्यावेळी अल्जीरियाने भारताला मदत केली होती.

# भारताच्या शत्रूसोबत रशियाचा करार? मास्कोने पाकिस्तानी माध्यमांच्या दाव्यातील सत्य आणले समोर

भारत आणि पाकिस्तान दरम्यान तणाव असताना रशियाने पाकिस्तासोबत मोठा आर्थिक करार केला, या पद्धतीच्या बातम्या काही दिवसांपूर्वी पाकिस्तानी माध्यमातून आल्या होत्या. रशियाने पाकिस्तानी माध्यमांचा हा दावा फेटाळला आहे. रशिया आणि पाकिस्तान यांच्यासोबतच्या कराराची बातमी केवळ अफवा असल्याचे रशियाने म्हटले आहे. भारत आणि रशियाचे संबंध पटरीवरुन उतरवण्याचा हा प्रयत्न आहे, असेही रशियाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. पाकिस्तानमधील मीडिया आउटलेटने दावा केला होता की,



रशियाने पाकिस्तानसोबत स्टील प्लँट पुन्हा सुरु करण्यासाठी करार केला आहे. १९७० मध्ये सोव्हियत संघासोबत पाकिस्तान स्टील मिल्ससोबत डिझाइन केलेला हा प्लँट आहे. तो प्लँट सुरु करण्यासाठी पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांचे विशेष सहायक हारुन अख्तर खान आणि मास्कोचे प्रतिनिधी डेनिस नजरूफ यांच्या दरम्यान १३ मे रोजी इस्लामाबादमध्ये बैठक झाली होती.

### रशियाने फेटाळला दावा

पाकिस्तानी मीडिया रिपोर्टमध्ये म्हटले की, रशिया आणि पाकिस्तान दरम्यान २.६ अब्ज डॉलरचा करारावर स्वाक्षरी झाली. परंतु रशियाने पाकिस्तानी माध्यमांमध्ये आलेला हा दावा फेटाळला आहे. या पद्धतीच्या कोणताही करार झाला नाही. भारत-रशिया दरम्यान असलेल्या दृढ संबंधांना नुकसान पोहचवण्यासाठी या बातम्या पेरल्या गेल्या आहेत. परंतु हा अयशस्वी प्रयत्न आहे. भारत आणि रशियाचे संबंध ऑपरेशन सिंदूरनंतर अधिक घट्ट झाले आहेत, असे रशियाने म्हटले आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com